


**श्री सद्गुरु योगीराज धाग महाराज**

गिरगांव–मुंबई

प्रश्न–महाराज, तत्त्वज्ञानाचे वाचन करुन स्वतःला ज्ञानी समजणारे लोक मूर्ति पूजेचा उपहास करतात, मूर्ति पूजा करणारांना हिन समजतात. त्यांना परमेश्वराचे ज्ञान नाही. दगडांत देव नाही असं म्हणतात त्याबद्दल आपले काय मत आहे ?

उत्तर-मूर्तिपूजा करणारांना हिन समजून त्यांची टिगल करणें बरोबर नाही. परमेश्वराच्या सत्य स्वरुपाची अनुभूति नसतांना जर कोणी, आपण ज्ञानाचे अधिकारी आहोत, आपण ज्ञानी आहोंत. अशी स्वतःबद्दल कल्पना करुन घेतात व ते स्वतःचीच फसवणूक करुन घेत असतात व असे लोक जर मूर्ति पूजेचा उपहास करत असतील तर ते बरोबर नाहीं. असे लोक स्वतःचाच आत्मघात करुन घेत असतात व सगुण भक्ति करणाऱ्या जीवाल्याहि संभ्रमांत टाकण्याचे पातक करीत असतात. मूर्ति शिवाय सामान्य जीवाला भक्ति करताच येणार नाही. सर्व विश्वाला व्यापून राहिलेला सर्व शक्तिमान परमेश्वर त्या मूर्तीच्या ठिकाणी साकार झालेला आहे, अशी त्या भक्ताची दृढ श्रद्धा असतें. भक्त त्या मूर्तीला भोग अर्पण करतो. आपली सुख दुःखे सांगतो. आपले मनोगत बोलून दाखवतो, तो ती दगडाची मूर्ति आहे म्हणून नव्हे, तर आपल्या दुःखांचे निवारण करुन सुख प्राप्ती देणारा सर्व शक्ति मान परमात्मा साकार स्वस्वरुपांत आपल्यापुढे आहे अशी त्या भक्ताची भावना असते. भक्ताच्या याच भावनेंतून, श्रद्धेतून भक्तितून पुढे ज्ञानी, सत्पुरुषांच्या सहवासाने, कृपेने त्याला परमेश्वाच्या सत्य स्वरुपाचे ज्ञान होते व तो कृतकृत्य होतो. सर्व सामान्य जीवाला भक्तीची आवड निर्माण होण्यासाठी व पुढे परमेश्वराच्या सत्य स्वरुपाचे ज्ञान होण्यासाठी मूर्तीची आवश्यकता नाकारता येणार नाही.

सर्व कल्याणकारी वेद जीवाला कर्म-उपासना आणि ज्ञानाच्या उपदेशाने अध्यात्म मार्गावर पुढे नेण्याचा प्रयत्न करतात. जो ज्या अवस्थेत असेल त्याला त्या अवस्थेतूनच अध्यात्मिक ज्ञान प्राप्त व्हावे हेच वेदांचे ध्येय आहे. वेदांत सांगितलेले कर्मकाण्ड आणि उपासनाकाण्ड यांचा अंतिम हेतू असा आहे की, जीव अधिकारानुसार कर्मोपासनेला प्रवृत्त होऊन अंतःकरणाच्या शुद्धीद्वारे तत्त्वज्ञानाचा अधिकारी व्हावा भावि परमात्मा निष्ठावान होऊन त्याला शाश्वत सुख शांती प्राप्त व्हावी.

**बहूतां सुकृती नरदेह लाधला । भक्तिविण गेला अधोगती ।।**

कारण सुक्ष्म आणि स्थूल या प्रकारे भेद असणारे हे जग आणि त्याला धारण करणाऱ्या परब्रह्माच्या ज्या अंशापासून त्याची आत्मस्वरुपांत व आधारस्वरुपांत अभिव्यक्ति होते तेवढेंच त्या परमात्म्याचे स्वरुप नाही तर त्याहूनहि भिन्नपण आहे, म्हणून त्याची ज्या अंशापासून अभिव्यक्ति होते आणि त्यांहि पलीकडे जे कांही आहें, ते सर्व मिळून परब्रह्म परमात्म्याचे समग्ररुप आहे. तात्पर्य असे की, जे कोणी परब्रह्माला केवळ साकार मानतात किंवा निराकार मानतात किंवा सर्वथा निर्विशेष मानता त्यांना (अशा ज्ञान्याना) सर्वज्ञ सर्वाधार आनंद विज्ञान इत्यादि कल्याणमय गुणांनी संपन्न आहेत असे मानले जात नाही ते सर्व परमेश्वराच्या एक एक अंशालाच परमात्मा मानतात पूर्ण ब्रह्मपरमात्मा साकारपण आहे व निराकार पण आहे. त्याचप्रमाणे तो साकार निराकाराहून रहितपण आहे संपूर्ण विश्व त्याचेच स्वरुप आहे व तो त्यापासून अलगपण आहे. तो सर्व गुण रहित निर्विशेषहि आहे आणि सर्व गुण संपन्नपण आहे. अशा तऱ्हेने त्या परमात्म्याला मानणे हे त्याला सर्वांग पूर्ण मानणें आहें.

अभंग–कविता

# गीता बोध

श्रीकृष्ण सांगे वीर अर्जुनासी ॥
येण्या मजपाशी । शुद्ध होई ॥१॥

अहंकार सर्व । मनामाजी जाळी ॥
येई तू जवळी । भक्तीभावे ॥२॥

भविष्याची चिंता । ठेवूनिया दूरी ॥
वर्तमानावरी । लक्ष ठेवी ॥३॥

करुनिया कर्मे अर्पी मजलागी ॥
असा होई त्यागी । या संसारीं ॥४॥

तेव्हां तुज मिळे । माझीच संगती ॥
भक्त म्हणे चित्ती । ठेवा तुम्ही ॥५॥

कवि–विश्वंभर.

# –: वारकरी :–

"वारकरी" या शद्वावर निरनिराळ्या कोट्या केलेल्या आपण ऐकतो. त्यापैकी कांही खालील प्रचारात आहेत–

१) वार करणारा तो वारकरी. २) वारी करणारा तो वारकरी. परंतु यांतून कोणताच अर्थ स्पष्टपणे व्यक्त होत नाही. वार! कशाचा? तलवारीचा, काठींचा, शद्वांचा कां विचारांचा आणि कोणावर व कशासाठी? इत्यादि खुलासा केला जात नाही.

"वारकरी" हा शद्व केव्हां, कोणी, कोणासाठी आणि कां? प्रचारात आणला, हे शोधणे जरुर आहे. तरी आपणांस कोणाला "वारकरी" शद्वाचा इतिहास माहित असेल तो कळवावा.

जीव शिव दोन्ही हरिरुपी तरंग । सिंधू तो अभंग नेणें हरि ॥